उद्योग विभागाने तयार केलेल्या खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीच्या नियम पुस्तिकेनुसार या विभागासाठी राबवावयाच्या खरेदी पध्दतीकरीता विविध स्तरावरील खरेदी समित्या पुर्नगठित करुन त्यांच्या वित्तीय अधिकारात सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : पीईक्यू-०११६/प्र.क्र.३३१/पोल-४,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- ३१ जुलै, २०१९

वाचा : १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-१०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक ०२.०१.१९९२.
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमआयएस-०४०९/५९२/प्र.क्र.२७०/पोल-४, दि.२०.०५.२००९.
३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ३०.१०.२०१५.
४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक. ०१.१२.२०१६
५) गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पीईक्यू-०११६/प्र.क्र.३३१/पोल-४,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक. ०७.०९.२०१६.
६) गृह विभाग शासन शुद्धीपत्रक क्रमांक पीईक्यू-०११६/प्र.क्र.३३१/पोल-४,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ०४.०७.२०१८.
७) पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/१७/६१६२/वित्तीय अधिकार मर्यादा-खरेदी/३३/२०१८,दि.०५.०७.२०१९

प्रस्तावना :-

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियम पुस्तिका तयार करुन ती मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निर्गमित केली आहे. तसेच, त्यानुसार सर्व खरेदीदार विभागाने त्यांना लागणाऱ्या वस्तुंची खरेदी या नियम पुस्तिकेत दिलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी, असे नमूद केले आहे.

सदर नियम पुस्तिकेच्या परिच्छेद २.९.१ मध्ये नमूद केल्यानुसार संदर्भ क्रमांक ५ व ६ अन्वये विभागाने तातडीची खरेदी, मर्यादित निविदा, स्विस चॅलेंज इत्यादीच्या खरेदीसाठी उच्चाधिकार समिती, परिच्छेद २.९.२ मध्ये प्रशासकीय विभाग/कार्यालयांतर्गत खरेदी समिती आणि परिच्छेद

२.९.३ मध्ये नमूद केल्यानुसार विभाग स्तरावर/जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय खरेदी समिती स्थापन करुन त्यांना वित्तीय अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुषंगाने संदर्भ क्र.५ व ६ अन्वये विभागाने विविध स्तरावरील खरेदी समित्या गठीत करुन त्यांना वित्तीय अधिकार प्रदान केले होते. तथापि, संदर्भ क्र.७ मधील प्रस्तावानुसार सदर गठीत केलेल्या खरेदी समित्यांच्या रचनेमध्ये व वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उद्योग विभागाच्या उपरोक्त नमूद खरेदी धोरणाप्रमाणे संदर्भ क्र.५ व ६ मधील शासन निर्णय व शासन शुध्दीपत्रक अधिक्रमित करुन राज्य स्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती, विभागीय स्तरावरील खरेदी समिती (पोलीस विभागासाठी/गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दलाकरीता), विभागीय स्तरावरील खरेदी समिती (न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयासाठी), आणि जिल्हा स्तरावरील खरेदी समिती यांची रचना व वित्तीय मर्यादा खालीलप्रमाणे सुधारित करुन गठित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ. खरेदीसाठीची उच्चाधिकार समिती

राज्य पोलीस दल, बृहन्मुंबई पोलीस दल, गृह रक्षक दल व नागरी संरक्षण, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय यांच्यासाठी खरेदी करावयाच्या उपकरणांच्या/साधनसामुग्रीच्या अनुषंगाने तातडीची खरेदी, मर्यादित निविदा/निर्बंधित निविदा, स्विस चॅलेंज, इत्यादी पध्दतीच्या खरेदीसाठी एक उच्चस्तरीय खरेदी समिती नेमण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.

१	अपर मुख्य सचिव (गृह)	अध्यक्ष
२	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त विभाग)	सदस्य
३	विकास आयुक्त (उद्योग)	सदस्य

या उच्चाधिकार समितीला रुपये १.०० कोटी वरील बाबीची तातडीची खरेदी, मर्यादित निविदा, निर्बंधित निविदा, स्विस चॅलेंज अन्वये खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील. या समितीने खरेदी करण्यास मान्यता दिल्यानंतर विभागामार्फत प्रशासकीय मान्यता देवून वित्तीय अधिकार मर्यादेमध्ये उचित स्तरावर खरेदी प्रक्रिया राबवावी.

ब. राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती

राज्य पोलीस दल, बृहन्मुंबई पोलीस दल, होमगार्ड, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय इत्यादी विभागासाठी खरेदी करावयाच्या उपकरणांच्या/साधनसामुग्रीच्या अनुषंगाने तातडीची खरेदी, मर्यादित निविदा/निर्बंधित निविदा, स्विस चॅलेंज इत्यादी पध्दतीच्या खरेदीसाठी नियमपुस्तिकेत घालून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार खरेदी प्रक्रिया हाती घेण्यासाठी प्रशासकीय विभागांतर्गत खरेदी समिती (डीपीसी/पीसी) गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.

१	अपर मुख्य सचिव (गृह)	अध्यक्ष
२	पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
३	प्रधान सचिव (विशेष),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई	सदस्य
४	उद्योग सहसंचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी	निमंत्रित
५	लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब दर्जाचा लेखाधिकारी	निमंत्रित
६	अन्य विभागांकडून (जसे, वित्त विभाग) कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास	निमंत्रित
७	तांत्रिक तज्ञ, आवश्यकता असल्यास,	निमंत्रित
८	सह सचिव/उप सचिव, गृह विभाग	सदस्य-सचिव

सदर राज्यस्तरीय खरेदी समितीसमोर न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय तसेच पोलीस विभागंतर्गत ज्या-ज्या विभागांचे/विभाग प्रमुखांचे खरेदी प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येतील, त्यावेळेस त्या-त्या विभागांचे/विभाग प्रमुखांचे प्रभारी किंवा प्रतिनिधी यांना राज्यस्तरीय खरेदी समितीच्या बैठकीस निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात यावे. विभागाच्या राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समितीला रू.१.०० कोटी प्रति नग ते रू.२.०० कोटी प्रति नग किंमतीच्या साधनसामुग्री/उपकरणे खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील. राज्यस्तरीय खरेदी समितीच्या बैठकीत प्रस्तावाची छाननी झाल्यानंतर समितीने मान्य केलेल्या रु.१.०० कोटी ते रू.२.०० कोटी प्रति नग पर्यंतच्या प्रस्तावास समितीची मान्यता पोलीस महासंचालकांना व अन्य संबंधितांना कळविण्यात येईल.

तसेच, रू.२.०० कोटी प्रति नग यावरील किंमतीच्या साधनसामुग्री/उपकरणे खरेदी करण्यास राज्यस्तरीय खरेदी समितीच्या मान्यतेनंतर मा.मंत्री (गृह) यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

क. विभागीय स्तरावर खरेदी समिती (पोलीस विभागासाठी)

पोलीस महासंचालक यांचे अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयाकरीता खरेदी करावयाची उपकरणे/साधनसामुग्री/साहित्याकरीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती स्थापन करण्यात येत आहे.

१	पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई	अध्यक्ष
२	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई	सदस्य
३	सह सचिव/उपसचिव, गृह विभाग	सदस्य
४	उद्योग सहसंचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी	निमंत्रित
५	लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब दर्जाचा लेखाधिकारी	निमंत्रित
६	अन्य विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास	निमंत्रित
७	तांत्रिक तज्ञ, आवश्यकता असल्यास,	निमंत्रित
८	अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य-सचिव

सदर समितीच्या बैठकीमध्ये पोलीस विभागाच्या अधिपत्याखालील ज्या विभागाचे खरेदीचे प्रस्ताव असतील (उदा.मोटार परिवहन,बिनतारी संदेश विभाग,फोर्स वन,दहशतवाद विरोधी पथक इत्यादी), अशा विभागातील सदस्यांनाच बैठकीसाठी बोलविण्यात यावे. पोलीस विभागासाठीच्या विभागीय स्तरावरील खरेदी समितीला प्रति नग रू.१.०० कोटी पर्यंतच्या किंमतीच्या साधनसामुग्री/ उपकरणे खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील. त्यावरील प्रतिनग किंमती बाबतचे प्रस्ताव राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक राहील.

ड. विभागीय स्तरावर खरेदी समिती (गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दलाकरीता)

गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल यांच्या अधिनस्त विविध कार्यालयाकरीता खरेदी करावयाची उपकरणे/ साधनसामुग्री/ साहित्याकरीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती स्थापन करण्यात येत आहे.

१	महासमादेशक,गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल,महाराष्ट्र राज्य,मुंबई	अध्यक्ष
२	उप महासमादेशक,गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल,महाराष्ट्र राज्य,मुंबई	सदस्य
३	सह सचिव/उपसचिव, गृह विभाग	सदस्य
४	उद्योग सहसंचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी	निमंत्रित
५	लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब दर्जाचा लेखाधिकारी	निमंत्रित
६	अन्य विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास	निमंत्रित
७	तांत्रिक तज्ञ, आवश्यकता असल्यास,	निमंत्रित
८	वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल,महाराष्ट्र राज्य,मुंबई	सदस्य-सचिव

गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल, महाराष्ट्र राज्य,मुंबई या विभागाकरीता विभागीय स्तरावरील खरेदी समितीला एकूण रू.१.०० कोटी पर्यंतच्या किंमतीच्या साधनसामुग्री/उपकरणे खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील.

इ. विभागीय स्तरावर खरेदी समिती (न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयासाठी)

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयासाठी खरेदी करावयाची उपकरणे/ साधनसामुग्री करीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे.

१	महासंचालक, (न्यायिक व तांत्रिक) महाराष्ट्र राज्य, मुंबई	अध्यक्ष
२	संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई	सदस्य
३	सह सचिव/उपसचिव, गृह विभाग	सदस्य
४	उद्योग सहसंचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी	निमंत्रित
५	लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब दर्जाचा लेखाधिकारी	निमंत्रित
६	अन्य विभागांकडून (जसे, वित्त विभाग) कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास	निमंत्रित
७	तांत्रिक तज्ञ, आवश्यकता असल्यास,	निमंत्रित
८	सह संचालक/जेष्ठतम उप संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई	सदस्य-सचिव

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयासाठीच्या विभागीय स्तरावरील खरेदी समितीला प्रति नग रू.१.०० कोटीपर्यंतच्या किंमतीच्या साधनसामुग्री/उपकरणे खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील. त्यावरील प्रतिनग किंमती बाबतचे प्रस्ताव राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक राहील.

ई. जिल्हास्तरावरील खरेदी समिती

पोलीस विभागांतर्गत जिल्हास्तरावर खरेदी करावयाची उपकरणे/साधनसामुग्री करीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे.

१	पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/समादेशक	अध्यक्ष
२	महाव्यवस्थापक (जिल्हा उद्योग केंद्र)/प्रतिनिधी	सदस्य
३	लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब दर्जाचा लेखाधिकारी	निमंत्रित
४	अन्य विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास	निमंत्रित
५	तांत्रिक तज्ञ, आवश्यकता असल्यास,	निमंत्रित
६	पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/समादेशक यांचे कार्यालयातील गट-अ दर्जाचा वरिष्ठ पोलीस अधिकारी	सदस्य-सचिव

पोलीस विभागांतर्गत पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समितीला एकूण खरेदी मूल्य रू.२५.०० लाखापर्यंत आणि पोलीस अधीक्षक/समादेशक यांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समितीला साधनसामुग्री/उपकरणांचे एकूण खरेदी मूल्य रू.१०.०० लाखापर्यंत खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील. त्यावरील किंमतीचे सर्व प्रस्ताव एकत्रितपणे विभागस्तरावरील समितीकडे खरेदी करण्याकरीता पाठविणे बंधनकारक असेल.

२. उदयोग विभागाच्या खरेदीबाबतच्या नियमपुस्तिकेत विहित केलेली खरेदीची कार्यपध्दती अवलंबून त्यांना खरेदी करावयाच्या बाबीसंबंधात विभागीय खरेदी समिती (डीपीसी) सर्व निर्णय घेईल. याबाबतीत कोणतीही तफावत असल्यास, त्यासाठी विकास आयुक्त (उद्योग) यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक असेल. डीपीसी ही खरेदी सर्व टप्प्यांशी, म्हणजे तपशीलवार वैशिष्टयांना अंतिम स्वरूप देण्यापासून ते निविदा देण्यापासून ते निविदा प्रक्रियेनंतरच्या संबंधित सर्व निर्णयांसाठी जबाबदार राहील.

३. त्याचप्रमाणे, एखादया यंत्रसामग्रीची/उपकरणाची खरेदी करण्याचे ठरल्यानंतर विभागाची गरज लक्षात घेऊन त्या अनुषंगाने नि:पक्षपातीपणे तांत्रिक विर्निदेश (Technical Specification) ठरविण्यासाठी संबंधित खरेदीदार विभागास तांत्रिक समिती गठित करावयाची असल्यास, त्यांनी स्वतंत्र तांत्रिक समितीची रचना व कार्यपध्दती निश्चित करावी.

४. पोलीस दलासाठी विविध प्रकारची हत्यारे, अश्रुधूर व दारुगोळा खरेदी करावा लागतो. ही खरेदी मुख्यत्वे केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या विविध आर्डनन्स फॅक्टरीकडून किंवा आयात करुन केली जाते. शस्त्रात्रे खरेदी देखील समान गरज लक्षात घेवून पोलीस महासंचालकाकडून एकत्रित प्रस्ताव तयार करुन खरेदी करण्यात येईल.

५. राज्य पोलीस दलातील विविध विभागप्रमुखाच्या खरेदीच्या अनुषंगाने प्रत्येक महिन्यात खरेदी समितीच्या झालेल्या बैठका, त्यामध्ये खरेदीस मान्यता दिलेल्या बाबी व त्यावरील खर्च याचा तपशील पोलीस महासंचालक,गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाकडून शासनास सादर करण्यात येईल.

६. सदर खरेदी समित्यांनी उद्योग विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियम पुस्तिकेमध्ये विहित केलेल्या नियमाचा व कार्यपध्दतीचा काटेकोरपणे अवलंब करण्यात यावा. तसेच, सदर समित्यांनी आलेल्या समितीने त्यांना ठरवून दिलेल्या वित्तीय अधिकाराच्या मर्यादेतच खरेदी प्रक्रिया अवलंबवावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७३११७०५४१२६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Somnath Vasant Potare

Digitally signed by Somnath Vasant Potare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d677dcd1bc3bed55a48ddbdaad925a6651c5d43a12d84cf305d3ff791ea7f16, serialNumber=17e9c3c1ef20b007fefc5a1f1ec0e69f061648d4f897d5822e9f0e56899502e0, cn=Somnath Vasant Potare
Date: 2019.07.31 17:11:07 +05'30'

(सोमनाथ पोटरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. महासमादेशक, गृहरक्षक दल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. संचालक, उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

७. अपर पोलीस महासंचालक (नि व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. सर्व पोलीस आयुक्त
१०.सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक
११.संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२.सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.सचिव, (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई/नागपूर
१५.महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर
१६.संचालक, लेखा व कोषागरे संचालनालय, मुंबई
१७.सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१८. सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस गट
१९.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२१.महाव्यवस्थापक, सर्व जिल्हा उद्योग केंद्र
२२.वित्त विभाग (का.व्यय-७/अर्थसंकल्प-१०/अर्थोपाय/(कोषा-प्र-५/विनियम), मंत्रालय, मुंबई
२३.गृह विभाग (का.बीयुडी-१/विशा-८), मंत्रालय, मुंबई
२४.निवडनस्ती, गृह विभाग/पोल-४.